**ठळक बातम्या**

- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज ९व्या स्वच्छ सर्वेक्षण पुरस्कारांचं वितरण, राज्यातल्या नवी मुंबई, मीरा-भाईंदर आणि कराडला पुरस्कार

- देशातल्या दहा लाख नागरिकांना कृत्रिम बुद्धिमत्तेचं प्रशिक्षण विनाशुल्क देण्याची अश्विनी वैष्णव यांची घोषणा

- येत्या चार महिन्यांत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होतील अशी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची विधानसभेत माहिती

- राज्यातल्या सर्व जिल्ह्यांमध्ये विज्ञान आणि नाविन्यता उपक्रम केंद्रं सुरु करण्याची आशिष शेलार यांची विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात घोषणा

**आणि**

- नाशिक इथं झालेल्या कार अपघातात ७ जणांचा मृत्यू, २ जण गंभीर जखमी

**<><><><>**

प्राचीन काळापासून स्वच्छता हा देशाच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक चेतनेचा भाग असल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटलं आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज नवी दिल्लीत ९व्या स्वच्छ सर्वेक्षण पुरस्कारांचं वितरण करण्यात आलं, त्यावेळी त्या बोलत होत्या. स्वच्छ भारत अभियानांतर्गत राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांच्या प्रयत्नांचं कौतुक करताना राष्ट्रपती मुर्मू म्हणाल्या की स्वच्छ सर्वेक्षण हा एक यशस्वी उपक्रम ठरला आहे.

स्वच्छ भारत मिशन - शहरी अंतर्गत स्वच्छतेसाठी राबवण्यात येणाऱ्या उपक्रमाअंतर्गत यावर्षी सुपर स्वच्छ लीग शहरं आणि लोकसंख्येच्या आधारे पाच श्रेणींमध्ये पुरस्कार प्रदान करण्यात आले. यामध्ये, इंदूरने सलग आठव्या वर्षी भारतातील सर्वात स्वच्छ शहर म्हणून आपला किताब कायम ठेवला. केंद्र सरकारच्या वार्षिक स्वच्छता सर्वेक्षणात सुरत दुसऱ्या क्रमांकावर आहे, तर नवी मुंबई तिसऱ्या क्रमांकावर आहे. तसंच लोकसंख्येच्या आधारे विभागण्यात आलेल्या ५ श्रेणींमध्ये राज्यातल्या मीरा- भाईंदर, कराड या शहरांना सुपर

स्वच्छ शहर पुरस्कार मिळाला आहे. या कार्यक्रमादरम्यान, विविध श्रेणींमध्ये एकूण ७८ पुरस्कार प्रदान करण्यात आले.

<><><><>

देशातील दहा लाख नागरिकांना एआय अर्थात कृत्रिम बुद्धीमत्तेचं प्रशिक्षण विनाशुल्क देण्याची घोषणा केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी केली. ते नवी दिल्ली इथं 'सामान्य सेवा दिवस - डिजिटल भारताची दहा वर्षे' या कार्यक्रमात बोलत होते. या प्रशिक्षणासाठी ग्रामीण स्तरावरच्या उद्योजकांना प्राधान्य देण्यात येईल असंही त्यांनी यावेळी स्पष्ट केलं.

युपीआय पेमेंटची संख्या व्हिसाच्या पेमेंटहून जास्त झाल्याचं सांगत डिजिटल भारत ही संकल्पना आणि त्याचे लाभ घराघरापर्यंत पोचवण्यासाठी सामान्य सेवा केंद्रातील कर्मचाऱ्यांनी घेतलेल्या कष्टांचा त्यांनी गौरव केला. आयआरसीटीसी सेवा नागरिकांपर्यंत पोचवण्यासाठी पुढे येण्याचं आवाहन वैष्णव यांनी यावेळी ग्रामीण उद्योजकांना केलं

<><><><>

पंढरपूर इथला सुधारित तीर्थक्षेत्र आराखडा लवकरात लवकर पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात येतील असं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज विधानसभेत सांगितलं. सदस्य हेमंत रासने यांनी यासंदर्भात लक्षवेधी उपस्थित केली होती. या आराखड्याअंतर्गत पंढरपुरातल्या सफाई कामगारांना ६०० चौरस फुटांची घरं देण्यात येणार असून, यासाठी सोलापूर जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश दिले जातील असंही पवार यांनी सांगितलं. राज्य उत्पादन शुल्क विभागात सध्या सुरु असणाऱ्या भरती प्रक्रियेत बदल करण्याबाबत विधी आणि न्याय विभागाचा अभिप्राय घेऊन निर्णय घेण्यात येईल, असं पवार यांनी सदनात सांगितलं. दुय्यम निरीक्षकांची पदोन्नतीद्वारे होणारी पुढील भरती शंभर टक्के जवानांमधून केली जाईल, असं ते म्हणाले.

मुंबईला तोडण्याचं नाही तर जगाशी जोडण्याचं काम सरकार करत आहे. आगामी काळात मुंबईचा जीडीपी दुप्पट होईल, असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. ते आज विधानसभेत २९३ अंतर्गत झालेल्या चर्चेला उत्तर देत होते. मुंबईत गेल्या अडीच वर्षांत अनेक विकासकामं झाली असून पुढच्या काही वर्षांत मुंबई खड्डेमुक्त होईल असं उपमुख्यमंत्री म्हणाले. रखडलेले प्रकल्प पूर्ण करण्याचा प्रयत्न सरकार करत आहे. गिरणी

कामगारांना चार पाच हजार घरं दिली आहेत. झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्पातही गिरणी कामगारांसाठी घरं ठेवावीत असा निर्णय सरकारने घेतला आहे. पात्र गिरणी कामगारांची नोंदणी केली आहे, असं उपमुख्यमंत्र्यांनी सांगितलं. ओबीसी आरक्षणामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांना सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली होती. त्यामुळे या निवडणुका आतापर्यंत झाल्या नाहीत. येत्या चार महिन्यांत या निवडणुका होतील असं शिंदे यांनी स्पष्ट केलं. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उत्तरावर राइट टू रिप्लाय करण्याची मागणी विरोधी पक्षांनी केली. या मुद्द्यावरून झालेल्या गदारोळामुळे अध्यक्षांनी सभागृहाचं कामकाज दहा मिनिटांसाठी तहकूब केलं.

राज्यातील अनेक वरिष्ठ अधिकारी आणि नेते हनिट्रॅपमध्ये अडकले असून संवेदनशील, गोपनीय माहिती बाहेर गेली आहे. याबाबत सरकार गंभीर असून यावर कारवाई केली जाईल असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज विधानसभेत सांगितलं. काँग्रेस नेते नाना पटोले यांनी याबाबत प्रश्न विचारला होता. यावर या प्रकरणातली तक्रार मागे घेतल्याचं गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी माध्यमांना सांगितल्याचा मुद्दा भास्कर जाधव यांनी उपस्थित केला. त्यामुळे सरकार या प्रकरणी दिशाभूल करत आहे का असं जाधव म्हणाले. यावर सभागृहात गदारोळ झाला आणि विरोधी पक्षाच्या सदस्यांनी सभात्याग केला.

**<><><><>**

मिठी नदीतला गाळ काढण्याच्या कामात २०१९ ते २०२१ या तीन वर्षांत ६५ कोटींचा घोटाळा झाल्याचं समोर आलं असून यात काही जणांना अटकही करण्यात आल्याची माहिती उद्योगमंत्री उदय सामंत यांनी आज विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासाला आमदार प्रसाद लाड यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या उत्तरात दिली. या प्रकरणाचा तपास राजकारण न करता व्हावा, यात जे जे सामील असतील त्यांना शोधून काढू, तसे निर्देश एसआयटीला दिलेले आहेत, असं आश्वासन सामंत यांनी दिलं. आमदार अनिल परब, भाई जगताप यांनीही या प्रश्नावरच्या चर्चेत भाग घेतला.

मुंबईत धोकादायक इमारतींमध्ये राहणारे भाडेकरू किंवा रहिवाशांसाठी या जून महिन्यापासून २५० चौरस फुटांच्या इमारती भाड्यानं घेऊन तिथं त्यांच्यासाठी संक्रमण शिबिरं करायचा निर्णय सरकारने घेतल्याची माहिती मंत्री शंभुराज देसाई यांनी आज विधानपरिषदेत आमदार भाई जगताप यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या उत्तरात दिली. यंदा मुंबई

इमारत दुरुस्ती आणि पुनर्रचना मंडळाने केलेल्या पावसाळापूर्व सर्वेक्षणात मुंबई शहरातल्या एकंदर ९६ इमारती अतिधोकादायक असल्याचं आढळून आलं असून त्यातल्या २ हजार ५७७ भाडेकरू अथवा रहिवाशांची पर्यायी व्यवस्था संक्रमण शिबिरात करायची कार्यवाही सुरू असल्याची माहितीही त्यांनी दिली.

<><><><>

राज्यातल्या सर्व जिल्ह्यांमध्ये विज्ञान आणि नाविन्यता उपक्रम केंद्रं सुरु होतील अशी घोषणा माहिती तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार यांनी आज विधीमं◌ंडळाच्या दोन्ही सभागृहात केली. राजीव गांधी विज्ञान आणि तंत्रज्ञान आयोगामार्फत वर्ष २०१५पासून राज्यातल्या काही जिल्ह्यांमध्ये विज्ञान आणि नाविन्यता उपक्रम केंद्रं सुरु आहेत. येत्या पाच वर्षांमध्ये इतरही जिल्ह्यांमध्ये अशी केंद्रं सुरु होतील. तसंच राज्यात अठ्ठावीस नवीन टेक्नॉलॉजी लॅब उघडणार असल्याचंही शेलार यांनी सांगितलं.

सध्या वारणानगर, प्रवरानगर, अमरावती, सातारा, बारामती, देवरुख अशा सहा ठिकाणी अशी केंद्रं सुरु आहेत. त्यातून विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञान, वैज्ञानिक प्रयोग, रोबोटिक्स, थ्रीडी प्रिंटींग, कोडींग या क्षेत्रांचा परिचय करुन दिला जातो. शिक्षकांना प्रशिक्षण तसंच शैक्षणिक साधन सामग्री दिली जाते. या केंद्रांना उत्तम प्रतिसाद मिळत आहे. नांदेड, अकोला आणि परभणी या जिल्ह्यात या केंद्रांच्या उभारणीचं काम प्रगतीपथावर आहे. विज्ञान तंत्रज्ञान केंद्रांचा उपक्रम हा नवीन शिक्षणधोरणात समाविष्ट असलेल्या अनुभवाधिष्ठित आणि प्रयोगाधारित शिक्षण तसंच वैज्ञानिक दृष्टीकोन या उद्दीष्टांशी सुसंगत आहे. जेष्ठ शास्त्रज्ञ जयंत नारळीकर यांना मानवंदना म्हणून त्यांचं नाव या विज्ञान तंत्रज्ञान केंद्रांना देणार असल्याचं शेलार यांनी यावेळी सांगितलं.

<><><><>

नाशिक जिल्ह्यात एक कार आणि मोटारसायकलमध्ये धडक होऊन झालेल्या अपघातात ३ महिला आणि एका बालकासह ७ जणांचा मृत्यू झाला. तर २ जण गंभीर जखमी झाले आहेत. नाशिक- दिंडोरी रस्त्यावर काल रात्री अल्टो गाडी दुचाकीला धडकून दोन्ही वाहनं रस्त्यालगत असलेल्या एका लहान नाल्यात उलटली, अशी माहिती पोलिसांनी दिली. जखमींना उपचारासाठी नाशिक जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

//<><><><>//